# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

## रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनाट क्रमांक २४२-२२** **दिनांक ०८/०८/२०२२**

## INSTAGRAM ॲपवर MAKE MONEY HOME ONLINE अशा जाहिरातीद्वारे फसवणूक करण्या-या टोळीस जेरबंद करण्यात सायबर गुन्हे कक्षास यश.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत आचोळे पोलीस ठाणेचे हद्दीत राहणा-या फिर्यादी सौ. दिपीका वर्मा यांना त्यांचे इंस्टाग्रामचे ॲपवर अज्ञात आरोपीतांनी मेक मनी होम ऑनलाईन या नावाची लिंक पाठवून त्यांची वैयक्तिक व बँकेची माहिती भरण्यास सांगितली. तसेच सदर लिंकवर ऑनलाईन गेम टास्क पुर्ण करण्यास सांगितले. मात्र फिर्यादी यांनी सदर माहिती भरल्यानंतर त्यांची ८८,६००/- रु. ची फसवणुक झाल्याने त्यांनी आचोळे पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन गु.रजी.नं २९८/२०२२ भा.दं.वि.स. कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने आचोळे पोलीस ठाणे यांनी सायबर गुन्हे कक्षाची तांत्रीक मदतीबाबत पत्रव्यवहार केला असता सायबर गुन्हे कक्षाने फिर्यादी यांच्या फसवणूक झालेल्या रक्कमेबाबत पेटीएम, एस बँकेकडे पत्रव्यवहार व पाठपूरावा करुन कौशल्यपुर्वक तांत्रीक तपास केला व तपासामध्ये सायबर गुन्हे कक्ष यांनी खालीलप्रमाणे आरोपी निष्पन्न करुन त्यांना पुढील कार्यवाहीकामी आचोळे पोलीस ठाणे यांच्या ताब्यात दिलेले आहे.

१) विक्रम रंगनाथ केदारे रा. रुम नं ४१७, जय जिवदानी, नगिनदास पाडा नालासोपारा पुर्व
(तेज ट्रेडींग कंपनी च्या एस बँक खात्यात रक्कम स्विकारणारा इसम – खाते क्र. 018963300004343)

२) शैलेश शांताराम कापकर वय ३० वर्षे रा. रुम नं ४०२, साई भक्ती अपार्टमेंट, दत्त नगर नालासोपारा पुर्व
(खाते खोलण्यास प्रवृत्त करणारा व मदत करणारा इसम) अटक दिनांक ०१/०८/२०२२ रोजी २३.०६ वाजता

३) सतिष सुरेश पाटील, वय -३१ वर्षे, रा.रुम नं २, रामनगर, न्यु आग्रीपाडा, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई
(यस बँक कर्मचारी – जाणीवपुर्वक खोटे केवायसी अपडेट केले, साईट व्हेरीफीकेशन केले नाही)
अटक दि.– ०५/०८/२०२२ रोजी २२.१६ वा

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूकीचा प्रकार आपल्या सोबत घडलेला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्ष, www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अति.कार्य. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोलीस अंमलदार/१२०९२ प्रविण आव्हाड, १२०९५/ गणेश इलग, महीला पोलीस अंमलदार/ १२००७ माधूरी धिंडे , १६१०६/सुवर्णा माळी, म.सु.ब.आकाश बोरसे यांनी पार पाडली आहे.